# क्विक हिल करणार सायबर क्राईम जागरूकता

। इंदौर : सायबर क्राईमबाबत जागरूकता वाढवण्यासाठी इंदूर शहर सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा उपक्रम राबवण्यात येणार आहे. क्विक हिल टेक्नॉलॉजी व्यावसायिक सामाजिक जबाबदारी (सीएसआर) म्हणून त्यांच्या क्विक हिल फाऊंडेशन (क्यूएचएफ) च्या माध्यमातून हा उपक्रम राबवणार आहे. या उपक्रमासाठी इंदूर शहर पोलीस आणि सायबर सेलची टीम मदत करणार असून, १२ दिवसांत १०० हून अधिक पथनाट्ये केले जाणार आहेत. या उपक्रमाचा भाग म्हणून कंपनीने 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' हा विशेष उपक्रम लाँच केला आहे. जो, स्मार्ट शहरांमध्ये सायबर सुरक्षेबद्दल लोकांना जागरूक करण्यासाठी पथनाट्यांची मालिका आहे. याबाबत क्विक हीलच्या प्रवक्त्यांनी सांगितले की, आज अनेक बाबी या ऑनलाइन होत आहेत. त्यामुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढत आहे. हे विशेषतः एक लाखापेक्षा जास्त लोकसंख्या (टियर १) आणि ५०,००० ते १,००,००० दरम्यान लोकसंख्या (टियर २) असलेल्या शहरांमध्ये घडत आहे. या शहरांतील नागरिक अनेक आर्थिक व्यवहार, सामाजिकीकरण आणि संवादासाठी स्मार्टफोन वापरत आहेत. एक निरीक्षण पुढे आले आहे की, इंटरनेट वापरत असलेल्या अनेकांना ऑनलाइन सर्फिंगसाठी आवश्यक मूलभूत बाबींची अजूनही माहिती नाही, त्यातून अनेक स्मार्टफोन वापरकर्ते सायबर गुन्हेगारांना त्यांचे विविध प्रकारचे शोषण करण्याची संधी देण्यासाठी वैयक्तिक किंवा आर्थिक माहिती उघड करतात. आमच्या 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' उपक्रमाद्वारे फसवणुकीच्या प्रकरणांना सावध कसे राहावे याविषयी सर्वांना, विशेषतः २८ ते ३८ वयोगटातील व्यक्ती आणि विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे.

